boalnashik2025@gmail.com

दैनिक बोल नाशिक

PRGI No. MHBIL/25/-2129

प्रत्येक बातमीचा निःपक्ष खुलासा

मुख्यसंपादक : प्रशांत हिरे | रविवार । दि.७ जून २०२६ | वर्ष : १ ले | अंक : १६३ | पाने : ४ | किंमत : २ रु. | संपादक : मायकल खरात | कार्यकारी संपादक : देविदास बैरागी

# महागाईचा भडका, सर्वसामान्य होरपळला!

## जिल्हाधिकारी कार्यालयावर उद्धवसेनेचा बैलगाडी मोर्चा

## इंधन दरवाढीचा निषेध असोच्याघोषणा देत सरकारवर हल्लाबोल

**नाशिक । प्रतिनिधी**




इंधन दरवाढ आणि गगनाला भिडलेल्या महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले असताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आज नाशिकमध्ये आक्रमक आंदोलन छेडले. निषेध! निषेध! निषेध! च्या घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसर दणाणून सोडला. महागाईमुळे पेट्रोल-डिझेल परवडेनासे झाल्याने संतप्त शिवसैनिकांनी बैलगाडी जुंपून थेट जिल्हाधिकारी कार्यालय गाठले. पुन्हा बैलगाडीचे दिवस आले असा टोला लगावत केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांवर सडकून टीका करण्यात आली.

जिल्हाप्रमुख बाळू कोकणे, ऋषी वर्मा, सागर कोकणे, कैलास जाधव, प्रविण चव्हाण, मंदार बर्वे, श्रीकांत चव्हाण, सुभाष गायधनी, निलेश साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली शेकडो शिवसैनिक रस्त्यावर उतरले. महागाई हटवा, जनता वाचवा, इंधन दरवाढ मागे घ्या अशा घोषणा देत आंदोलकांनी सरकारचे लक्ष वेधले. सत्ताधारी फक्त निवडणुकीपुरते गोड बोलतात. सत्ता मिळताच सामान्य जनतेला वाऱ्यावर सोडून महागाईचा वरवंटा फिरवतात.

सिलिंडर, पेट्रोल, डिझेल, खाद्यतेल... सर्वच गोष्टींचे दर गगनाला भिडले. शेतकरी, कामगार, नोकरदार सगळेच मेटाकुटीला आलेत, असा घणाघात यावेळी करण्यात आला. आंदोलनानंतर शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. इंधन दरवाढ तात्काळ मागे घ्या, महागाईवर नियंत्रण आणा, अन्यथा शिवसेना स्टाईलने तीव्र आंदोलन छेडू, असा इशारा यावेळी देण्यात आला. सरकारने जर जनतेच्या भावनांची कदर केली नाही, तर रस्त्यावर उतरून जाब विचारू. हा तर फक्त ट्रेलर होता, पिक्चर अजून बाकी आहे, असा इशारा शिवसेना नेत्यांनी दिला.

## कोटंबी घाट चिखलमय वाहने अडकली

### घाट रुंदीकरणाच्या कामावर नागरिकांचा संताप

**पेठ । प्रतिनिधी**



पेठ तालुक्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले. अनेक ठिकाणी रस्त्यांवर झाडे कोसळल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण झाला. तसेच वीजवाहिन्यांचे नुकसान झाल्याने अनेक गावांमध्ये रात्रभर वीजपुरवठा खंडित राहिला. त्यामुळे नागरिकांना अंधारात रात्र काढावी लागली. दरम्यान, तालुक्याची जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या कोटंबी घाटाची पहिल्याच पावसात दैना उडाली. गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या घाट रुंदीकरणाच्या कामामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात चिखल साचला आहे. पावसामुळे संपूर्ण घाट परिसर चिखलमय बनल्याने वाहनचालकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे.

विशेषतः अवजड कंटेनर व मालवाहू वाहने चिखलातून मार्ग काढताना मोठी कसरत करताना दिसली. अनेक दुचाकीस्वार तसेच चारचाकी वाहने चिखलात अडकून पडल्याच्या घटना घडल्या. त्यामुळे घाटातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली

**कामाला गती देण्याची मागणी**

घाटाचे काम नेमके कधी पूर्ण होणार, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. प्रशासनाने तातडीने रस्त्यावरील चिखल हटवून वाहतुकीस सुरक्षित व्यवस्था करावी, तसेच घाट रुंदीकरणाच्या कामाला गती द्यावी, अशी मागणी वाहनधारकाकडून व्यक्त होत आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, पावसाळा तोंडावर असताना घाट रुंदीकरणाच्या कामाचे योग्य नियोजन झाले नाही. त्यामुळे पहिल्याच पावसात कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मुसळधार पाऊस झाल्यास परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## 'तेल्या'ने उद्ध्वस्त झाली सहा एकर डाळिंब बाग

### जळगाव नेऊरला शेतकऱ्याने फिरवला नांगर

**येवला । प्रतिनिधी**



अवकाळी हवामान बदल आणि कडक उन्हाच्या झळांमुळे डाळिंब उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला असून येवला तालुक्यातील जळगाव नेऊर येथे तेल्या रोगाच्या प्रादुर्भावाने सहा एकर डाळिंब बाग उद्ध्वस्त झाली आहे. लाखों ची गुंतवणूक करून जोपासलेली बाग वाचविण्याचे सर्व प्रयत्न अपयशी ठरल्यानंतर शेतकऱ्यावर बागेवर ट्रॅक्टर फिरविण्याची वेळ आली. जळगाव नेऊर येथील डाळिंब उत्पादक शेतकरी बबन शिंदे,

## वीजपुरवठ्याच्या समस्येवर नगरसेवकाचे महावितरणवर कार्यालयासमोर धडक मोर्चा

**नाशिकरोड । प्रतिनिधी**



प्रभाग क्र. १६ व परिसरात वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याच्या निषेधार्थ गुरुवारी (दि. ४) महावितरणच्या उपनगर कार्यालयासमोर नागरिकांनी धरणे आंदोलन केले. यावेळी वीजपुरवठा नियमित व सुरळीत करण्याची मागणी करण्यात आली. परिसरात गेल्या काही दिवसांपासून वारंवार वीज खंडित होत असल्याने नागरिक, व्यापारी, विद्यार्थी तसेच ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः उन्हाळ्याच्या दिवसांत वीजपुरवठा खंडित झाल्याने पाणीपुरवठा व दैनंदिन कामकाजावर परिणाम होत असल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. यावेळी नगरसेवक तथा स्थायी समिती सदस्य राहुल दिवे यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी महावितरण प्रशासनाला निवेदन सादर केले. वीजपुरवठ्यातील अडचणी तातडीने दूर करून नियोजित वीजबंदबाबत नागरिकांना पूर्वसूचना देण्याची मागणी करण्यात आली.

मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास भविष्यात अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. उपस्थित नगरसेविका पूजा ताई नवले नगरसेविका आशा तडवी नगरसेविका ज्योती जोंधळे प्रवीण नवले अनिल जोंधळे रफिक तडवी दीपक साळवे सुनील जाधव राहुल गायकवाड दिलीप प्रधान प्रवीण धारूनकर लखन पगारे मुन्ना तडवी कुणाल पगारे अजय दिवे राहुल जावरे संजय लोखंडे सचिन पगारे राहुल देवरे अमोल फुलसुंदर गौरव तुषार सोनकांबळे कार्तिक विसपुते निखिल साळवे सनी साळवे बाबा लोखंडे निखिल लोखंडे फहीम शेख रोशन साळवे रोहित शेलार जयंत म्हैसदुणे माणिक अहिरे अनिकेत बागुल ओम वाघ सुनील मोरे अक्षय कटारे प्रतीक कटारे धनंजय थेटे रवी चव्हाण शेवंता क्षीरसागर ,पद्मा गायकवाड ,लता मरसाळे, लीला वाघ, मंगला कुलथे आदी उपस्थित होते.

## गंगापूर पोलिसांनी सराईत मोबाईल स्नॅचर 'नन्या'ला केले गजाआड

### २१ महागडे मोबाईल, ५ चोरीच्या दुचाकींसह ६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नाशिक । प्रतिनिधी**




रस्त्याने पायी जाणाऱ्या नागरिकांचे मोबाईल हिसकावून पळणाऱ्या सराईत टोळीच्या मुसक्या आवळण्यात गंगापूर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाला मोठे यश आले आहे. ज्ञानेश्वर उर्फ नन्या मोतीराम दिवे, रा. गोवर्धनगाव आणि गोवर्धन उर्फ गौरव गोपाळ शेवरे, वय २०, रा. हातरुंडी, पेठ या दोघांना अटक करून पोलिसांनी २१ महागडे मोबाईल व ५ चोरीच्या मोटारसायकली असा एकूण ६ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

दि. २ मे २०२६ रोजी दुपारी १:३० वाजता फिर्यादी वसंतराव पवार चौकाकडून दत्त चौक, डी. के. नगर रस्त्याने पायी जात असताना ऋषीराज कन्स्ट्रक्शनसमोर पाठीमागून निळ्या पल्सर १२५ वर आलेल्या दोघांनी त्यांच्या हातातील मोबाईल जबरदस्तीने हिसकावून नेला. याप्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०९ (४), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी मोबाईल स्नॅचिंगच्या गुन्हेगारांना तात्काळ जेरबंद करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक शरमाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तपास सुरू केला. सीसीटीव्ही फुटेज तपासताना पोलीस अंमलदार सुजित जाधव यांनी स्नॅचर हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार ज्ञानेश्वर उर्फ नन्या दिवे असल्याची खात्री केली.

आरोपी हातरुंडी, पेठ येथे असल्याची माहिती मिळाल्यानंतर पथकाने त्र्यंबकेश्वर, घोटी, इगतपुरी परिसरात शोध घेतला. त्यावेळी दुसरा आरोपी गोवर्धन शेवरे हातरुंडी येथे सापडला. गोपनीय माहितीच्या आधारे 'नन्या' हा कॅनालरोड, पाटीलवस्ती, गंगापूर शिवार येथे निळ्या एनएस पल्सरवर येणार असल्याचे कळताच पोलिसांनी साध्या वेशात सापळा रचला. चहुबाजूंनी घेराव घालून क्षणार्धात त्याला ताब्यात घेण्यात आले.

चौकशीत दोघांनी पल्सरवरून नागरिकांचे मोबाईल हिसकावल्याची कबुली दिली. त्यांच्याकडून वन प्लससह २१ महागड्या कंपनीचे मोबाईल आणि ठाणे ग्रामीण, निफाड, सातपूर, अंबड, गोवर्धनगाव येथून चोरलेल्या ५ मोटारसायकली जप्त करण्यात आल्या. यामध्ये निफाडमधील होंडा शाईन, सातपूरमधील ड्रीम युगा, नाशिक तालुक्यातील ॲक्टिव्हा, गणेशपुरीतील स्प्लेंडर व अंबडमधील एनएस १२५ पल्सरचा समावेश आहे. या कारवाईत गंगापूरचे २ स्नॅचिंगचे व ५ वाहनचोरीचे असे एकूण ७ गुन्हे उघडकीस आले आहेत.

**गुन्हे व जप्त मुद्देमाल**

१ गंगापूर पो.स्टे गुरनं २४३/२०२६ वन प्लस मोबाईल
२ अंबड पो.स्टे गुरनं ४८१/२०२६ एनएस १२५ पल्सर
३ निफाड पो.स्टे गुरनं २८/२०२६ होंडा शाईन
४ सातपूर पो.स्टे गुरनं ४१०/२०२६ ड्रीम युगा
५ नाशिक तालुका पो.स्टे गुरनं १३०/२०२६ ॲक्टिव्हा
६ गणेशपुरी पो.स्टे गुरनं ३२/२०२३ स्प्लेंडर
७ नाशिक शहरात विविध कंपनीचे २० मोबाईल जप्त, तपास सुरू

ही कामगिरी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उपायुक्त मोनिका राऊत, सहायक आयुक्त सुधाकर सुराडकर यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि अशोक शरमाळे, सपोनि तुषार देवरे, पोहवा गिरीश महाले, रविंद्र मोहिते, भागवत थवील, पोअं सुजित जाधव, गोरख साळुंके, प्रविण केदारे, तुळशीदास चौधरी, मच्छिंद्र वाकचौरे, मनोज भोये, यशराज पोतन, घनश्याम भोये, सागर बोधले, दिपक दुसाणे यांनी केली. पुढील तपास पोहवा गिरीश महाले करीत आहेत.

## संक्षिप्त...



### नाशिक रोड येथे माजी सैनिकांतर्फे वृक्षारोपण उत्साहात

नाशिक रोड ।माजी सैनिक कल्याण संघटनेतर्फे पर्यावरणदिनानिमित्त नाशिक रोड येथे वृक्षारोपण कार्यक्रम झाला.नाशिक रोडचे सभापती रमेश धोंगडे,उद्यान निरीक्षक वर्पे यांच्याहस्ते वृक्षारोपण झाले. संघटनेचेएच. पी. पांडेय, एस. एन. मिश्रा, आई. बी. गुरूंग, बी. के. वर्मा, अजितकुमार राणा, एस. के. सिंह, दिलीप बडगुजर यांची प्रमुख उपस्थिती होती. रमेश धोंगडे यांनी पर्यावरण बचाव व संवर्धनासाठी वृक्षरोपणाचे आवाहन केले. बी. के. वर्मा, आर. एन. अवस्थी यांनी पर्यावरण प्रदूषण, वृक्षतोड थांबवून नद्यांचे रक्षण करण्याचे आवाहन केले. अजितकुमार राणा यांनी झाडे तोडणा-यांवर कठोर कारवाईची मागणी केली. एस. के. सिंह यांनी वृक्षारोपणाचे आवाहन केले. रमेश धोंगडे यांनी माजी सैनिक कल्याण संघटनेच्या समाजगृहासाठी त्वरित कार्यवाहीचे आश्वासन दिले. दिलीप बडगुजर यांनी आभार मानले.




### प्रेसच्या वसाहतीत जवानांचे वृक्षारोपण

नाशिक रोड । जागतिक पर्यावरण दिनानिमित्त केंद्रीय औद्यागीक सुरक्षा दलाच्या (सीआयएसएफ) करन्सी नोट प्रेसमधील युनीटतर्फे प्रेसच्या नेहरूनगर कर्मचारी वसाहतीत वृक्षारोपण कार्यक्रम झाला. सीआयएसएफचे उपकमांडंट ऋग्वेद सावंत, सीआयएस्एफेच्या संरक्षिका अध्यक्षा प्रियांका केदारे यांच्याहस्ते वृक्षारोपण झाले. सीआयएसएफचे निरीक्षक अग्नी, सिंग,प्रभाकर सिंग,श्वेता रंजन,उपनिरीक्षकयश त्यागी यांची प्रमुख उपस्थिती होती. अधिकारी, जवान, त्यांच्या कुटुंबियांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड केली. युनिट परिसरात एकूण २५० वृक्षांची लागवड करून संवर्धनाचा संकल्प केला.

### नाशिक जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ग्रामरक्षक दल स्थापन करण्याचे निर्देश

नाशिक । अवैध दारू निर्मिती, विक्री व वाहतूक यांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये ग्रामरक्षक दल स्थापन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी दिले आहेत. याबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्र देण्यात आले आहे. त्यात म्हटले आहे, की महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ व महाराष्ट्र ग्रामरक्षक दल नियम २०११ नुसार प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ग्रामरक्षक दलाची स्थापना करणे आवश्यक आहे. या दलामार्फत स्थानिक पातळीवर अवैध दारूविषयक माहिती संकलित करून ती पोलीस तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे पाठविण्यात येणार आहे. यापूर्वी सन २०१७ मध्ये जिल्ह्यातील विविध ग्राम पंचायतींमध्ये प्रायोगिक स्वरूपात ग्रामरक्षक दल स्थापन करण्यात आले होते. नव्याने दल स्थापन करण्याचे प्रमाण अत्यल्प असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी प्रसाद यांनी जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच संबंधित गटविकास अधिकाऱ्यांना आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये ग्रामरक्षक दलाची स्थापना सुनिश्चित करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

## संपादकीय...

# मूल्य नाही; मान तरी!

अवघ्या पाच महिन्यांनी, ८ नोव्हेंबर २०२६ या दिवशी अर्थक्रांतीच्या शालेय बुद्धिमत्तेचे दर्शन घडवणार्या निश्चलनीकरणाचा दशकपूर्ती दिन. एरवी उत्सवांसाठी असे काही 'दिन' शोधत असणार्या सत्ताधार्यांकडून हा दशकपूर्ती सोहळा साजरा केला जाईल किंवा कसे याचे औत्सुक्य समस्त विकासेच्छू भारतीयांस निश्चितच असेल. कारण दहा वर्षांपूर्वी २०१६ साली या दिवशी साक्षात पंतप्रधानांनी 'सव्वासो क्रोर' देशवासीयांसमोर काळ्या पैशाच्या निर्मूलनार्थ पाचशे आणि हजार रुपयांच्या नोटा यापुढे 'कागज के टुकडे' होणार असल्याचे शुभवर्तमान सुहास्यवदने सादर केले. नंतर काही तासांत 'पेटीएम'ने पंतप्रधानांचे आभार मानत असल्याच्या जाहिराती सर्वदूर प्रसृत केल्या आणि ही डिजिटल इंडियाच्या भरारीची आणि त्याचमुळे कागदी नोटांच्या अंताची सुरुवात असल्याचे आपणास सांगितले गेले. त्यापुढच्या काळात काळा पैसा कायमचा अंतर्धान पावता पावता कागदी चलनी नोटा हद्दपार होणार, सीमेपलीकडून बनावट नोटांचा पुरवठा आटणार, परिणामी काश्मिरातील हिंसाचार संपणार असे बरेच काही होणार असल्याची द्वाही फिरवली गेली. त्यानंतरच्या काळात काय काय झाले ते भारतीयांनी अनुभवले. त्यातच, गेली काही वर्षे सरासरी १५ टक्के इतक्या मोठ्या गतीने रोख रकमेचा सुळसुळाट वाढत चालल्याचे प्रतिपादन चलन व्यवहारावर नियंत्रण असलेली रिझर्व्ह बँक करत असेल तर त्या द्रष्ट्या निर्णयाच्या यशापयशाची वेगळी चिकित्सा करण्याचे कारण नाही.

तथापि नव्याने या विषयास स्पर्श करण्याचे कारण म्हणजे रिझर्व्ह बँकेचा ताजा निर्णय. तो आहे यापुढे कागदाऐवजी प्लास्टिकच्या नोटा चलनात आणण्याचा. कागदी नोटा लवकर खराब होतात आणि त्यांच्या निर्मितीचा खर्चही अधिक आहे असे कारण रिझर्व्ह बँक या संदर्भात देते. ते खरे असेलही. त्याच वेळी देशातील एक बडा सरकारस्नेही 'अ'द्योगपती प्लास्टिक नोटांसाठी आवश्यक रसायनांच्या उत्पादनात प्रवेश करत असल्याचे आरोप काहींकडून होतात. तेही खरे असतील. रिझर्व्ह बँकेस प्लास्टिक नोटांची गरज वाटणे आणि या 'अ'द्योगपतीच्या संभाव्य प्लास्टिक रसायनांस गिर्हाईक हवे असणे हे दोनही मुद्दे एकाच वेळी तितकेच सत्य असू शकतात. तशीही भारतीयांस गेल्या दहा वर्षांत अशा योगायोगांची सवय आहेच. (पाहा : सौर ऊर्जेवर केंद्राचा धोरणात्मक भर आणि त्याच वेळी काही 'अ'द्योगपतींचे या क्षेत्रात पदार्पण इत्यादी) तेव्हा हे दोनही खरे असले वा नसले तरी रिझर्व्ह बँकेकडून जो काही तपशील प्रसृत झाला त्यावरून एक बाब मात्र निश्चित निर्विवाद खरी असल्याचे स्पष्ट दिसते. ती म्हणजे नोटा वापरणार्यांच्या संख्येत होत असलेली लक्षणीय वाढ. आणि त्याबरोबर नोटा छापण्याच्या खर्चात झालेली वाढ. रिझर्व्ह बँकेच्या अहवालातच याबाबतचा तपशील असून तो थक्क करणारा आहे. रिझर्व्ह बँकेने गेल्या वर्षी केवळ नोटा छापण्यावर सुमारे पाच हजार कोटी रु. खर्च केले. तर यंदा हाच खर्च ६,३७८ कोटी इतका झाला. गेल्या वर्षी खराब झालेल्या, फाटलेल्या इत्यादी २३०० कोटी नोटा देशभर बँकेत जमा झाल्या. त्याआधीच्या वर्षात हीच संख्या २१०० कोटी इतकी होती. यातही हास्यास्पद वाटेल अशी बाब म्हणजे बँकेत बदलीसाठी आलेल्या बहुतांश नोटा या नव्या, २०१६ सालातील निश्चलनीकरणानंतर प्रसृत झालेल्या आहेत. यावरून या नोटांच्या छपाईचा, कागदाचा दर्जा काय हे ध्यानात यावे. या सर्व तपशिलाचा अर्थ एकच.

आपल्या देशात रोखीचे व्यवहार कमी होण्याचे काही नाव नाही. हे प्रमाण दरवर्षी ११.५ टक्क्यांनी वाढते असून १५ मे या एकाच दिवशी चलनात असलेल्या नोटांचे एकत्रित मूल्य ४२ लाख ८६ हजार कोटी रु. इतके आहे. यातील खरा धक्का हा की दहा वर्षांपूर्वी जेव्हा निश्चलनीकरण जाहीर झाले तेव्हा चलनातील रोख रकमेचे मूल्य फक्त १७ लाख ९७ हजार कोटी रु. इतके होते. आता ते जवळपास ४३ लाख रु. इतके आहे. म्हणजे गेल्या दहा वर्षांत चलनातील रोख रकमेचे प्रमाण जवळपास अडीच पटींनी वाढले. गेल्या एका वर्षापुरती ही झालेली 'चलनवाढ' एक लाख १५ हजार कोटी रुपयांची आहे. आपल्याकडे भाजीवालाही डिजिटल पेमेंट स्वीकारतो इत्यादी कौतुक नेहमी सांगितले जाते. ते ठीक. पण त्यामुळे रोख रकमेच्या गरजांत तसूभरही फरक पडलेला नसून उलट दहा वा वीस रुपयांच्या नोटांच्या मागणीत गेल्या काही वर्षांत सातत्याने वाढच होत असल्याचे दिसते. गेली काही वर्षे नोटांऐवजी नाणी लोकप्रिय करण्याचा प्रयत्न रिझर्व्ह बँकेने करून पाहिला. अगदी वीस रुपयांचीही नाणी बँकेने प्रसृत केली. हे नाणे इतक्या रकमेचे आहे हेच कळत नाही, अशी भले नागरिकांची तक्रार असेल. पण बँकेने प्रयत्न केला. गेल्या वर्षी विविध मूल्यांची १५० कोटी नाणी बँकेने चलनात आणली. त्यात ८० कोटी नाणी ही पाच रुपयांची आहेत आणि ४० कोटी २० रु. मूल्याची.

या सर्व खर्चाचा मोबदला तितक्या प्रमाणात मिळत नाही असे बँकेस वाटते.म्हणून मग आता प्लास्टिकच्या नोटा चलनात आणण्याची टूम. विकसित जगातील इंग्लंड, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया आदी देशांत अशा नोटा चलनात आहेत. या लवकर खराब होत नाहीत, हे उघड आहे. विशेषत: पाऊसपाण्यात नोटा भिजणे हे आपल्याकडील मोठे संकट. प्लास्टिकच्या नोटांमुळे त्यावर सहज मात करता येईल. दुसरे असे की अन्य अनेक प्लास्टिक चिजांप्रमाणे या नोटांस दीर्घायुष्य लाभते. एकदा छापल्या की वर्षानुवर्षे या नोटा 'चालतात'. तथापि प्लास्टिक म्हटले की पर्यावरण दुष्टतेचा आरोप ओघाने आलाच.

प्लास्टिकच्या नोटा यास अपवाद ठरतात. याचे कारण खराब झालेल्या नोटांचा पुनर्वापर करता येणे तंत्रदृष्ट्या शक्य होते. म्हणजे नोटा देऊन पुन्हा नोटा छापता येतात. तसेच या नोटा 'एटीएम'स्नेही देखील असतात. निश्चलनीकरणानंतर नव्या नोटा प्रसृत करताना आपल्याकडे नव्या नोटांचा आकार बदलण्याचा निश्चलीकरणाइतकाच अनाकलनीय निर्णय घेतला गेला. परिणामी बँकांस हजारो कोटींचा भुर्दंड केवळ नव्या नोटांच्या आकाराप्रमाणे एटीएम यंत्रांची फेररचना करण्यासाठी पडला. आता तसे होणार नाही, असे रिझर्व्ह बँकेचे म्हणणे. रिझर्व्ह बँकेची व्याजदराबाबतची तिमाही बैठक येत्या आठवड्यातच भरेल.

आखाती युद्ध, त्याचा अर्थव्यवस्थेस बसलेला फटका इत्यादी कारणांमुळे आणि मुख्य म्हणजे खनिज तेलाचे दर वाढल्यामुळे अर्थव्यवस्थेसमोर चलनवाढीचा धोका संभवतो. अशा वेळी व्याजाचे दर वाढवणे हा जालीम इलाज. पण तसे केल्याने सरकार दुखावते. कारण कर्जे, पतपुरवठा महाग होतो आणि वाढीचा वेग अधिकच मंदावतो. तेव्हा रिझर्व्ह बँकेच्या विद्यमान नेतृत्वाचा चेहरामोहरा लक्षात घेतल्यास व्याजदर वाढवला जाण्याची शक्यता तशी कमीच. बँक व्याजदराबाबत 'जैसे थे' धोरण अंगीकारेल, हीच शक्यता अधिक. तेव्हा नोटांच्या दरांबाबत काही निर्णय होवो वा न होवो. त्यांच्या रंगरूपाबाबत मात्र लवकरच निर्णय होईल असे दिसते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर रुपयाचे मूल्य वाढणार नाही, हे खरे. पण हा कागज का टुकडा प्लास्टिकचा झाला की निदान त्याचा मान तरी वाढेल, ही आशा.

# 'डॉन' बनण्याच्या इर्षेतून थेट गोळीबार; भाईगिरी कॅमेऱ्यात कैद

दैनिक बोल नाशिक

**नाशिक । प्रतिनिधी**

देवळालीगाव परिसरात बुधवारी मध्यरात्री एका तरुणावर गावठी कट्ट्यातून गोळीबार करण्यात आला. प्राण वाचवण्यासाठी तिसऱ्या मजल्यावर पळत गेलेल्या तरुणाने भीती बाजूला सारून मारेकऱ्यांचा थेट 'मोबाईल व्हिडिओ' शूट करायला सुरुवात केली. स्वत:चा थरारक व्हिडिओ तयार होत असल्याचे पाहून 'आम्हीच इथले डॉन' अशी मर्दुमकी दाखविणाऱ्या तथाकथित भाईंची पुरती पाचावर धारण बसली आणि त्यांनी तिथून पळ काढला. या डिजिटल पुराव्यामुळे पोलिसांनी संशयितांच्या मुसक्या आवळल्या आहेत.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार रितिक राजेंद्र पारचे (वय २५, रा. एनएमसी क्वार्टर, गांधीधाम) आणि संशयित राहुल निकम यांच्यात एक वर्षापूर्वी मोबाईलवरील मेसेजवरून वाद झाला होता. याच जुन्या वादाचा वचपा काढण्यासाठी आणि परिसरात स्वत:ची दहशत निर्माण करण्यासाठी ३ जून रोजी मध्यरात्री १२:३० च्या सुमारास राहुल निकम, त्याचा भाऊ किशोर ऊर्फ किशा निकम आणि एका अनोळखी इसमाने रितिकला गाठले. तुला लय माज आलाय का? या एरियात सर्व आम्हाला हप्ता देतात. इथे भाई फक्त आम्हीच आहोत! असे धमकावत किशोर निकमने गावठी कट्टा रितिकवर रोखला. जीवाच्या आकांताने रितिक गांधीधाम इमारतीच्या दिशेने पळू लागला. त्याचवेळी त्याला जिवे मारण्याच्या उद्देशाने किशोर निकमने पाठीमागून थेट गोळी झाडली. सुदैवाने रितिकने हुलकावणी दिल्यामुळे गोळी चुकली. रितिक इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर पोहोचला आणि त्याने धाडस दाखवून मोबाईलवर खाली उभ्या असलेल्या या गुंडांचे थेट व्हिडिओ शूटिंग सुरू केले. आपण कॅमेऱ्यात कैद होत असल्याचे पाहताच संशयित सैरभैर झाले; त्यांनी रितिकच्या दिशेने दगडफेक केली. मात्र, पुरावा गोळा झाल्याच्या भीतीने आणि परिसरात नागरिक जमा झाल्याचे पाहून, आज हा वाचला, पण जो मस्ती करेल त्याचा गेम वाजवू! अशी धमकी देत तिघेही दुचाकीवरून पळून गेले.

### तांत्रिक पुराव्यांनुसार तिघे गजाआड

या घटनेमुळे परिसरात प्रचंड घबराट पसरली होती. अखेर उपनगर पोलिसांनी रितिकच्या तक्रारीवरून राहुल निकम, किशोर निकम आणि त्यांच्या साथीदारावर भारतीय न्याय संहिता कलम १०९(१) (जिवे मारण्याचा प्रयत्न), ३५२, ३५१(२), १२५ आणि शस्त्र अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा तपास उपनिरीक्षक संजीव फुलपगारे करत असून, संशयितांचा व्हिडिओ हा या गुन्ह्यातील मोठा तांत्रिक पुरावा ठरणार आहे.

# मांडवी बु. ग्रामपंचायतीचा कौतुकास्पद पुढाकार अंगणवाड्यांना मिळाले आधुनिक स्वयंपाक साहित्य; कुपोषणमुक्तीकडे एक पाऊल

दैनिक बोल नाशिक

**तेलखेडी । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील बालकांच्या आरोग्याला प्राधान्य देत, मांडवी बु. ग्रामपंचायतीने कुपोषणमुक्तीच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. सरपंच निमाताई विजय पाडवी यांच्या पुढाकाराने गावातील अंगणवाड्या आणि शाळांना आधुनिक स्वयंपाक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे आता गावातील चिमुकल्यांना स्वच्छ आणि पौष्टिक आहार मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

अंगणवाडी केंद्रांमध्ये आहार शिजवताना साधनसामग्रीच्या अभावामुळे होणारी गैरसोय दूर करण्याचा निर्णय ग्रामपंचायतीने घेतला. या उपक्रमांतर्गत मोठ्या कुकरपासून ते पाणी साठवण्याच्या भांड्यांपर्यंतचे आवश्यक साहित्य अंगणवाडी सेविका व मदतनिसांकडे सुपूर्द करण्यात आले. यात भेबडदापाडा, पाटीलपाडा, रुणमाळपाडा, गुगलमालपाडा, कारभारीपाडा, कोलमचापडा, राकदयपाडा, उकलापाडा, सापलाबारा या परिसरातील पाड्यांवरील अंगणवाड्यांचा समावेश आहे. याप्रसंगी सरपंच निमाताई पाडवी यांच्यासह ग्रामपंचायत अधिकारी बी. बी. गिरासे, शिक्षण विस्तार अधिकारी बारी मॅडम, विस्तार अधिकारी गिते मॅडम, ग्रामपंचायत सदस्य आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.



ग्रामपंचायतीच्या या कृतिशील निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या पोषण आहारात मोठी सुधारणा होणार असून, स्थानिक स्तरावर उपस्थितांनी या कार्याचे भरभरून कौतुक केले. यावेळी ग्रामपंचायत पदाधिकारी आणि शिक्षण विभागाचे अधिकारी उपस्थित होते. ग्रामपंचायतीचा हा स्तुत्य उपक्रम इतर गावांनाही प्रेरणा देणारा ठरला आहे.

# जागतिक पर्यावरणदिनी शिरपूर येथे वृक्षारोपण

दैनिक बोल नाशिक

**नंदुरबार । प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ओम नगर मांडळ शिवार, शिरपूर यांच्या वतीने ओम नगर येथील ओपन स्पेसच्या परिसरात वृक्षारोपणाचा प्रेरणादायी उपक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संरक्षण, संवर्धन आणि हरित भविष्यासाठी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात स्थानिक नागरिक, युवक, महिला व स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी कडुनिंब, पिंपळ, आंबा, जांभूळ, करंज, अशोक, गुलमोहर आदी देशी व औषधी वृक्षांची लागवड करण्यात आली. एक झाड - एक जबाबदारी हा संदेश देत उपस्थितांनी लावलेल्या प्रत्येक झाडाच्या संगोपनाची जबाबदारी स्वीकारली. कार्यक्रमास मांडळ गावाचे पंचायत समिती सदस्य यतीश सोनवणे यांनी विशेष उपस्थिती दर्शवून पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी नागरिकांना अधिकाधिक वृक्ष लागवड करून त्यांचे संवर्धन करण्याचे आवाहन केले. वृक्षदान करून या उपक्रमाला मोलाचे सहकार्य करणाऱ्या सर्व वृक्षदाते, सामाजिक कार्यकर्ते व पर्यावरणप्रेमी यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले. त्यांच्या योगदानामुळे हा उपक्रम अधिक यशस्वी ठरला. तसेच स्थानिक नागरिकांनी श्रमदान करून परिसर स्वच्छता व वृक्षारोपणाची कामे केली.

# वालदेवी नदी स्वच्छता अभियान व वृक्षारोपणाला उत्स्फूर्त प्रतिसाद

### बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दीनिमित्त योगेश गाडेकर यांचा पर्यावरण संवर्धनाचा उपक्रम

दैनिक बोल नाशिक

**नाशिकरोड । प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिन तसेच शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त सौ. सत्यभामा गाडेकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा नगरसेवक योगेश सत्यभामा लक्ष्मण गाडेकर यांच्या पुढाकाराने वालदेवी नदी स्वच्छता अभियान व वृक्षारोपण कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात नागरिक, विविध सामाजिक संस्था आणि शासकीय विभागांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

देवळाली गाव शिवसेना शाखा (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या अभियानात रोकडोबावाडी पुल ते देवळालीगाव दशक्रिया शेडपर्यंत नदीच्या काठावरील तसेच नदीपात्रातील कचरा काढून परिसर स्वच्छ करण्यात आला. त्यानंतर देवळालीगाव गंधमुक्ती हॉलच्या मागील परिसरात तसेच विहितगाव दशक्रिया परिसरात विविध प्रजातींच्या वृक्षांचे रोपण करून पर्यावरण संरक्षणाचा संकल्प करण्यात आला.

सामाजिक बांधिलकी जपत पर्यावरण संवर्धनासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या सौ. सत्यभामा गाडेकर प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले. नागरिकांमध्ये पर्यावरणाबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या अभियानात विविध संस्था, स्वयंसेवक आणि परिसरातील नागरिकांनी श्रमदान करून सक्रिय सहभाग घेतला.

या उपक्रमात साधना एज्युकेशन, नाशिकरोड, सेंट फ्रान्सिस हायस्कूल (राणेनगर), शिवसेना शाखा देवळालीगावचे पदाधिकारी, लायन्स क्लब ऑफ देवळाली-नाशिकरोडचे अध्यक्ष केदार धर्माधिकारी, रोटरी क्लब, सुप्रेम हॉस्पिटलचे डॉ. प्रशांत भुतडा, इंडियन मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्षा डॉ. नम्रता मित्तल, डॉ. अमित मित्तल, शिखर संडे क्रिकेट क्लब तसेच नाशिक महानगरपालिकेच्या बांधकाम, आरोग्य, उद्यान, मलेरिया व घंटागाडी विभागातील अधिकारी-कर्मचारी सहभागी झाले होते.

मनपा बांधकाम विभागाचे सुरेश पाटील, हेमंत भालेराव, आरोग्य विभागाचे अशोक साळवे, विजय जाधव, विजय मोरे, करण निकम, राहुल तसांबड, सागर बारगळ, सुनिल सकट, उद्यान विभागाचे वर्पे सर, दत्ता महाले, हेमंत रौंदाळे, ज्ञानेश्वर हगवणे, भारत निकम तसेच अनेक सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांनी श्रमदान करून कार्यक्रम यशस्वी केला.

पर्यावरण संरक्षण ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असून स्वच्छ आणि हरित नाशिकरोड घडविण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांनी सर्व संस्था, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांचे आभार मानले.

# जिल्हा वार्षिक योजनेचे परिपूर्ण प्रस्ताव तातडीने सादर करावेत :जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते

### जिल्हा वार्षिक योजनेची आढावा बैठक संपन्न

दैनिक बोल नाशिक

**धुळे । (जिमाका वृत्तसेवा)**

जिल्हा वार्षिक योजना, आदिवासी उपयोजना आणि अनुसूचित जाती उपयोजनांतर्गत सन २०२६-२७ या वर्षासाठी मंजूर झालेल्या नियतव्ययाची सविस्तर माहिती घेऊन सर्व विभागांनी आवश्यक विकास कामांचे प्रस्ताव तातडीने सादर करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी दिले.

जिल्हा नियोजन सभागृहात जिल्हा वार्षिक योजनेची सर्वसाधारण, आदिवासी उपयोजना, अनुसूचित जाती उपयोजनांची आढावा बैठक आज सकाळी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते बोलत होत्या. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार,




पोलीस अधीक्षक विशाल आनंद, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुरज जगताप, निवासी उपजिल्हाधिकारी महादेव खेडकर, प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील, कार्यकारी अभियंता आर.आर. पाटील जिल्हा नियोजन अधिकारी सुनील सोनार, उपजिल्हाधिकारी संजय बागडे, उपविभागीय अधिकारी शरद मंडलिक (शिरपूर) यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते म्हणाल्या की, प्रत्येक विभागाने सन २०२६-२७ करिता मंजूर नियतव्ययाचा अभ्यास करून प्रस्तावित योजना, प्रलंबित कामे आणि उपलब्ध निधीचा विचार करून वर्षाचे संपूर्ण नियोजन तयार करावे. विकास कामांच्या तांत्रिक मान्यतेचे प्रस्ताव तातडीने सादर करून प्रशासकीय मंजुरीची प्रक्रिया पूर्ण करावी. तसेच जिल्हा नियोजन समितीच्या मागील बैठकीतील कार्यपालन अहवाल सादर करावा. वन विभागाने वन समिती मेळावे व कार्यशाळांचे नियोजन करावे. पोलीस विभागाने २४ नवीन पोर्टेबल पोलीस चौक्या, नवीन वाहने तसेच महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा उभारणीचे प्रस्ताव तयार करावेत. गतवर्षी पूर्ण झालेल्या विकास कामांची जिओ-टॅग छायाचित्रे आणि व्हीडिओ सादरीकरणासाठी पाठवावीत. तसेच सर्व पूर्ण झालेल्या कामांना यूडीआयडी देण्यात यावा.

विकास कामांचे प्रस्ताव तयार करताना ज्या भागांमध्ये अद्याप मूलभूत विकास कामे झालेली नाहीत, अशा भागांना प्राधान्य द्यावे. गतवर्षीच्या जिल्हा विकास आराखड्यातील मंजूर कामे तातडीने पूर्ण करावीत. तसेच चालू वर्षाच्या जिल्हा विकास आराखड्यासाठी सर्व विभागांनी आवश्यक प्रस्ताव आणि नियोजन वेळेत सादर करावे, असे जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी सांगितले.

यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी श्री. सोनार यांनी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत उपलब्ध निधी व खर्चाचा आढावा सादर केला. बैठकीत चालू वर्षातील मंजूर निधी, झालेला खर्च आणि आगामी वर्षाच्या नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पान १ वरून...

### 'तेल्या'ने उद्ध्वस्त झाली सहा एकर डाळिंब बाग...

गोकुळ शिंदे आणि योगेश शिंदे यांनी चार वर्षांपूर्वी सहा एकर क्षेत्रात डाळिंब बाग लागवड केली होती. बाग उभारणी, सिंचन व्यवस्था, खते, औषध फवारणी, मजुरी आणि देखभालीवर आतापर्यंत सुमारे ३० ते ३५ लाख रुपयांचा खर्च करण्यात आला होता. यंदा बाग चांगली बहरल्याने भरघोस उत्पादनाची अपेक्षा होती. मात्र, उन्हाळ्यातील तीव्र उष्णतेमुळे डाळिंब पिकावर तेल्या रोगाचा प्रादुर्भाव झाला. रोग नियंत्रणासाठी विविध उपाययोजना, औषध फवारणी आणि तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार प्रयत्न करण्यात आले. तरीही रोगाचा फैलाव रोखता आला नाही. त्यामुळे कुटुंबाने डाळिंब बाग काढून टाकण्याचा निर्णय घेतला.

कडक उष्णतेमुळे डाळिंब पिकावर तेल्या रोगाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाला. बहरलेली सहा एकर डाळिंब बाग अखेर काढून टाकण्याचा निर्णय घ्यावा लागला. यामध्ये अंदाजे ३० ते ३५ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. - बबन शिंदे, डाळिंब उत्पादक शेतकरी, जळगाव नेऊर

दैनिक बोल नाशिक

प्रकाशक व मुद्रक कल्पेश मधुकर बिरारी यांनी मालक श्री. प्रशांत सुभाष हिरे यांच्या वतीने हे पत्र कुलश्री प्रिंटर्स १, श्रीकुल अपार्टमेंट, गंगापूर रोड, पंपिंग स्टेशन, नासिक(महाराष्ट्र) ४२२०१३ येथे मुद्रित व ७८६, सुजाता बंगला, इंगळे नगर, जेलरोड, नाशिकरोड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी मालक, संपादक, प्रकाशक अगर मुद्रक सहमत असतीलच असे नाही. मालक श्री. प्रशांत सुभाष हिरे व श्री. मायकल खरात संपादक (महाराष्ट्र) (पी.आर.बी. कायद्यानुसार बातम्यांच्या निवडीसाठी जबाबदार) मो.नं. 9359261192 / 9145110443, सर्व अधिकार सुरक्षित. PRGI No. MHBIL/25/-2129. Email- boalnashik2025@gmail.com

दैनिक बोल नाशिक
PRGI No. MHBIL/25/-2129
प्रत्येक बातमीचा निःपक्ष खुलासा



# पदवीनंतर व्यावसायिक अभ्यासक्रमात संधी




ग्रज्युएशन झाल्यानंतर कोणत्या क्षेत्रात करिअर करावं, असा प्रश्न अनेकांना पडलेला असतो. दिवसेंदिवस काही क्षेत्रात अभ्यासक्रमही बदलत असल्याने बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे. बदलत्या काळानुसार प्रत्येकाने करिअरची वाटचल करताना स्वत:ला अपडेट ठेवणेही तितकेच महत्वाचे आहे. ग्रॅज्युएशनचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर करिअरच्या बाबतीत कोणते निर्णय घ्यावे? असा प्रश्न अनेकांना पडतो. पण काळजी करण्याची आता गरज नाही. कारण ग्रॅज्युएशननंतर प्रोफेशनल कोर्स तुम्ही करु शकता. असे काही कोर्सेस आहेत, जे पूर्ण केल्यावर तुमचे करिअर सेट होण्याबरोबरच भरपूर पैसा कमवण्याची संधी तुम्हाला मिळू शकते.

## डिजिटल मार्केटिंग

मार्केटिंगमध्ये करिअर करणं काही क्षेत्रात फायदेशीर ठरू शकतं. विशेषतः डिजीटल मार्केटिंगला खूपच मागणी आहे. तुम्हाला आवड असेल तर तुम्ही या डीजीटल कोर्स करण्याला प्राधान्य देऊ शकता. हा कोर्स करिअर सेट होण्यासाठी फायदेशीर ठरु शकतो. यामध्ये एसइओ ऑडिटिंग, पीपीसी, सोशल मीडिया स्ट्रॅटेजी आणि प्लॅनिंग, मोबाईल ॲडव्हर्टायझिंग अशाप्रकारच्या गोष्टी अनेक गोष्टी शिकायला मिळतात. तसेच या व्यवसायाला प्रचंड मागणी आहे.

## आर्टिफिशियल इंटेलिजन्स

बदलत्या काळाचा विचार करुन तुम्ही जर आर्टिफिशियल इंटेलिजेंस क्षेत्राशी संबंधित कोर्स केला, तर तुमचे करिअर सेट होऊ सकत. तंत्रज्ञान क्षेत्रात एआय तज्ज्ञांना मोठी मागणी असते. तुम्ही या क्षेत्रात डिप्लोमा आणि सर्टिफिकेट कोर्स करु शकता. तंत्रज्ञान क्षेत्रातील अनेक कंपन्या हे कोर्स ऑफर करतात.




## पीएमपी सर्टिफिकेशन

पीएमपी कोर्सलाही वाढती मागणी असल्यामुळं हा कोर्स करणे करिअरबाबतीत फायदेशीर ठरु शकते. पीएमपी म्हणजे प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रोफेशनल. या सर्टिफिकेशन कोर्सचा अभ्यासक्रम खूप महत्वाचा आहे. या अभ्यासक्रमानुसारच तुम्हाला संधी प्राप्त होतात. या प्रमाणपत्रात मॅन्युफॅक्चरिंग, फायनान्स,आयटी, हेल्थ केअर आणि अन्य काही महत्वाच्या क्षेत्रात नोकरीच्या मोठ्या संधी उपलब्ध होतात.



## डेटा सायन्स

तुम्हाला चांगली नोकरी मिळवायची असल्यास तुम्ही डेटा सायन्सचा कोर्सही करु शकता. या कोर्सच्या अभ्यासक्रमात डेटा सायन्स, मशीन लर्निंग कौशल्ये आणि तंत्रे काशी वापरायची, याबाबत शिकवले जाते. डेटा सायन्सच्या कोर्सला मोठी मागणी आहे. कारण या कोर्सच्या माध्यमातून डेटा सायन्सच्या समस्या सोडवता येतात. या कोर्सला खूप मागणी असल्यामुळं चांगली नोकरा शोधणे अधिक सोपे होईल.

## डिजिटल मार्केटिंग

सध्याच्या काळात डिजिटल मार्केटिंगची मागणी वाढली आहे. तुम्ही या फिल्डमध्ये करिअर करण्याचा विचार करत असाल तर तुम्ही डिजिटल मार्केटिंगचा सर्टिफिकेट किंवा डिप्लोमा कोर्स करु शकता. यासाठी फुल टाईम एमबीए कोर्स करण्याचाही पर्याय उपलब्ध आहे. डिजिटल मार्केटिंगचा कोर्स ऑनलाईन किंवा ऑफलाईन करायचा झाल्यास 6 महिन्यापासून ते १ वर्षापर्यंतचा डिजिटल मार्केटिंग कोर्स तुम्ही करु शकता. त्यानंतर तुम्ही डिजिटल मार्केटिंगचा व्यवसाय करु शकता. तसेच एखाद्या प्रायव्हेट कंपनीमध्ये नोकरी करता येईल.




## वेब डिझायनिंग

बारावीनंतर पुढे कोणत्या क्षेत्रामध्ये करिअर करावे? असा प्रश्न तुम्हाला पडला असेल तर तुम्ही वेब डिझायनिंगचा सर्टिफिकेट किंवा डिप्लोमा कोर्स करु शकता. हादेखील शॉर्ट टर्म कोर्सचा एक चांगला पर्याय आहे. हा कोर्स ६ महिने तसेच १ वर्षाचाही असतो. सध्या बाजारात वेब डिझायनिंग करणाऱ्यांची मागणी वाढली आहे. डिजिटल युगामध्ये ही मागणी आणखी वाढू शकते. डिजिटल मार्केटिंग आणि वेब डिझायनिंग हे दोन्ही कोर्स डिजिटल युगामुळे महत्त्वाचे आहेत. तुम्हाला आवड असेल तर तुम्ही हा कोर्स निवडू शकता. वेबसाईट युजर फ्रेंडली बनवणे हे वेब डिझायनरचे काम असते. हा कोर्स केल्यानंतर तुम्हाला प्रायव्हेट सेक्टरमध्ये नोकरी मिळू शकते. तुम्ही फ्रिलान्सिंग करुनही लाखोंची कमाई करु शकता.

# शॉर्ट टर्म कोर्सेसमध्ये बेस्ट पर्याय

बारावीच्या परीक्षेनंतर विद्यार्थी कोणता कोर्स करावा याचा विचार करत असतात. अशा विद्यार्थ्यांसाठी शॉर्ट टर्म कोर्सेसचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. शॉर्ट टर्म कोर्सेस वेगवेगळ्या प्रकारचे असतात. हे कोर्सेस २ महिन्यांपासून ते २ वर्षापर्यंतच्या कालावधीचे आहेत. पण फुल डिग्री कोर्सच्या तुलनेत हे कोर्सेस कमी खर्चिक आहेत. हे कोर्स करुन तुम्ही खासगी क्षेत्रामध्ये उत्तम करिअर करु शकता. महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुमचा रेग्युलर कोर्स करता करता तुम्ही हे शॉर्ट टर्म कोर्सेस करु शकता. या कोर्सेसविषयी सविस्तर जाणून घेऊयात.



## योगासन क्षेत्र

बारावीनंतर तुम्ही योगा इंस्ट्रक्टरही बनू शकता. हा करिअरचा एक चांगला पर्याय आहे. अनेक इन्स्टीट्यूटमध्ये योगासनांचे कोर्सेस शिकवले जातात. तसेच भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाकडूनही योग शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी अनेक कार्यक्रम राबवले जातात. या कोर्सेससाठीचा अभ्यासक्रम सरकारमान्य आहे. योग शिक्षकाचा कोर्स पूर्ण केल्यानंतर तुम्हाला एक सर्टिफिकेट मिळते. या सर्टिफिकेटनंतर तुम्ही शाळेत किंवा योगा इनस्टिट्यूटमध्ये योगा शिक्षक म्हणून अर्ज करु शकता. तुम्ही तुमच्या घरी किंवा मोकळ्या आवारात लोकांना योगासने शिकवून त्यातूनही चांगली कमाई करु शकता. सध्या लोकांचा कल योगासनांकडे वळला आहे.

# डेंटल हायजीनमध्ये उज्ज्वल भविष्य

दातांची स्वच्छता ही एक विशेष बाब आहे, आजच्या काळात प्रत्येकाने आपल्या दातांच्या स्वच्छतेकडे लक्ष देण्याची गरज आहे. तुमच्या दातांची चांगली काळजी घेण्यासाठी आम्ही नेहमी डेंटल हायजिनिस्ट किंवा डेंटल डॉक्टरकडे धावतो. दातांसंबंधीच्या प्रत्येक समस्येवर उपाय देणे हे त्यांचे काम आहे. ज्या विद्यार्थ्यांना बारावीनंतर कोणत्याही वैद्यकीय अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यायचा आहे, ते डिप्लोमा कोर्समध्ये डेंटल हायजीन कोर्स करू शकतात.



## २ वर्षांचा पदवीपूर्व कार्यक्रम

डिप्लोमा इन डेंटल हायजीन कोर्स हा २ वर्षांचा पदवीपूर्व कार्यक्रम आहे. ज्यामध्ये विद्यार्थ्यांच्या दातांसंबंधीच्या सर्व बाबींची सविस्तर माहिती दिली आहे. अभ्यासक्रमाद्वारे, विद्यार्थ्यांना व्यावसायिक दंत आरोग्यतज्ज्ञ म्हणून काम करण्यास तयार केले जाते जेणेकरून ते त्यांचे करियर बनवू शकतील आणि त्यांना चांगला वार्षिक पगार देखील मिळेल.

## पात्रता निकष काय?

डिप्लोमा इन डेंटल हायजीन कोर्स करण्यासाठी विद्यार्थ्यांनी मान्यताप्राप्त संस्थेतून विज्ञान विषयात १२ वी उत्तीर्ण केलेली असावी. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी विज्ञान, पीसीबी या मुख्य विषयांचे ज्ञान असणे अनिवार्य आहे. – विद्यार्थ्याला बारावीत किमान ५० टक्के गुण असणे आवश्यक आहे. राखीव वर्गातील विद्यार्थ्यांना गुणांच्या टक्केवारीत काही टक्के सूट मिळेल. त्यांना प्रवेशासाठी केवळ ४५ टक्के गुणांची आवश्यकता आहे. प्रवेशासाठी किमान वयोमर्यादा १७ वर्षे आणि कमाल २५ वर्षे आहे. गुणवत्ता आणि प्रवेश परीक्षा या दोन्हीच्या आधारे विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमात प्रवेश मिळू शकतो.

**प्रवेश परीक्षा** : अर्ज प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, प्रवेश परीक्षा घेतली जाते ज्यामध्ये विद्यार्थ्यांना चांगली कामगिरी करावी लागते.

**निकाल** : प्रवेश परीक्षेतील विद्यार्थ्यांच्या कामगिरीच्या आधारे, त्यांना एक रँक मिळतो, त्यानुसार त्यांना संस्थांचे वाटप केले जाते.

## प्रवेश प्रक्रिया

प्रवेश गुणवत्तेवर आधारित असो किंवा प्रवेश परीक्षा आधारित असो, विद्यार्थ्यांना संस्थेसाठी किंवा परीक्षेसाठी स्वत:ची नोंदणी करावी लागेल. यासाठी विद्यार्थ्यांना अधिकृत वेबसाइटला भेट देऊन नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. अर्ज – विद्यार्थ्यांना अर्ज प्रक्रियेसाठी नोंदणी करण्यासाठी लॉग इन करावे लागेल आणि सर्व आवश्यक माहिती प्रदान करावी लागेल. वैयक्तिक तपशील, मोबाईल नंबर, पालकांचे नाव, शैक्षणिक माहिती, बँक खाते तपशील भरून कागदपत्रे अपलोड करावी लागतात.

# आठ वर्षांपूर्वी झाले वडिलांचे निधन आयएएस बनून पूर्ण केले आईचे स्वप्न

देशातील सर्वात आव्हानात्मक परीक्षांपैकी एक मानली जाणारी यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण होणे, हे लाखो विद्यार्थ्यांचे स्वप्न असते. अनेक उमेदवार वर्षानुवर्षे केलेल्या कठोर परिश्रमानंतर आणि असंख्य प्रयत्नांनंतर यश मिळवतात, तर काही प्रतिभावान उमेदवार पहिल्याच प्रयत्नात परीक्षा उत्तीर्ण करून इतिहास घडवतात. तुमच्यात आवड असेल, तर तुम्ही तुमचे ध्येय नक्कीच साध्य करू शकता. अशाच एक आयएएस अधिकारी आहेत गरिमा लोहिया, ज्यांनी आठ वर्षांपूर्वी आपले वडील गमावले, पण त्यांनी कधीही हार मानली नाही. आपल्या आईचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी, त्यांनी २०२२ मध्ये केंद्रीय लोकसेवा आयोगाची (यूपीएससी) परीक्षा दिली आणि देशात दुसरा क्रमांक पटकावला.

## ऑनलाईन साधनांच्या माध्यमातून शिक्षण घेतले




गरिमा लोहिया

गरिमा ह्या मूळच्या बिहारमधील बक्सर येथील रहिवासी आहेत. बक्सरमध्येच जन्मलेल्या आणि वाढलेल्या गरिमाच्या वडिलांचा व्यवसाय होता, पण २०१४ मध्ये एका अपघातात त्यांच्या वडिलांचे निधन झाले. हा त्यांच्या कुटुंबासाठी एक मोठा धक्का होता, पण गरिमा आणि त्यांच्या आईने स्वतःला सावरले. आपल्या मुलीने आयएएस अधिकारी व्हावे हे त्यांच्या आईचे स्वप्न होते आणि गरिमा यांनी ते स्वप्न साकार केले. गरिमा यांनी त्यांचे प्राथमिक शिक्षण बक्सरमध्ये पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी २०२० मध्ये दिल्ली विद्यापीठाच्या किरोरी माल कॉलेजमधून अकाऊंटिंगमध्ये पदवी मिळवली. पदवीनंतर त्यांनी यूपीएससीची तयारी सुरू केली. कोविड-१९ महामारीच्या काळात देशव्यापी लॉकडाऊन लागू करण्यात आला आणि गरिमा यांनी या वेळेचा पुरेपूर उपयोग केला. त्यांनी कोणत्याही कोचिंग इनस्टिट्यूटमध्ये प्रवेश न घेता केवळ इंटरनेट आणि ऑनलाइन साधनांच्या माध्यमातून अभ्यास केला. त्यांनी यूट्यूब आणि इतर ऑनलाईन प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून आपली तयारी अधिक मजबूत केली. जेव्हा त्यांनी २०२१ मध्ये पहिल्यांदा यूपीएससी परीक्षा दिली, तेव्हा त्या प्राथमिक परीक्षाही उत्तीर्ण होऊ शकल्या नाही.

### समर्पण आणि कठोर परिश्रम आवश्यक

*पहिल्या प्रयत्नात अपयश आल्यानंतर, गरिमा यांनी आपली रणनीती बदलली आणि अभ्यासाचे तास वाढवले. त्यांनी दररोज रात्री ९ ते सकाळी ९ या वेळेत सुमारे १२ तास अभ्यास करण्यास सुरुवात केली. गरिमा यांनी अकाऊंटिंग आणि कॉमर्स हे वैकल्पिक विषय म्हणून निवडले. २०२२ मध्ये जेव्हा त्यांनी दुसऱ्यांदा यूपीएससी परीक्षा दिली, तेव्हा त्यांनी देशात दुसरा क्रमांक मिळवला आणि त्या आयएएस अधिकारी झाल्या. गरिमा सांगतात की, त्या रात्री ९ ते सकाळी ९ या वेळेत घरीच अभ्यास करायच्या. या काळात त्यांनी आपले संपूर्ण लक्ष अभ्यासावर केंद्रित केले होते. त्या म्हणतात की, यशासाठी कोणताही शॉर्टकट नाही; त्यासाठी फक्त समर्पण आणि कठोर परिश्रम आवश्यक आहेत.*

## स्कॉलरशिप ALERT

### डॉ. राजेंद्र प्रसाद शिष्यवृत्ती कार्यक्रम



**पात्रता** : इयत्ता १०वी-१२वी उत्तीर्ण आणि इतर विहित पात्रता.
**उत्पन्न** : ८ लाख किंवा त्यापेक्षा कमी
**विद्यावेतन** : ३०,००० पर्यंत
**शेवटची तारीख** : २८ जून, २०२६
**अर्ज कसा करावा** : तुम्ही ऑनलाइन अर्ज करू शकता.
**वेबसाइट** : tinyurl.com/39aat2jf

## अर्ज आमंत्रित

### न्यायिक फेलोशिप वर्ष - २०२६

**पात्रता** : दिवाणी किंवा फौजदारी खटल्यांमध्ये ५-७ वर्षांचा अनुभव असलेले कार्यरत न्यायाधीश किंवा दंडाधिकारी.
**कालावधी** : २ आठवडे
अर्ज कसा करावा : **तुम्ही** ऑनलाइन अर्ज करू शकता.
**शेवटची तारीख** : १ जून २०२६
वेबसाइट : tinyurl.com/3we9nk8e





### सेल्स एक्झिक्युटीव्ह (सीएलसी) इंटर्नशिप

सेल्स एक्झिक्युटिव्ह (सीएलसी) इंटर्नशिप
**संस्था** : पीटीओएल इम्पॅक्ट लर्निंग एम्पॉवर्स

## इंटर्नशिप ALERT

प्रायव्हेट लिमिटेड
**कालावधी** : ६ महिने
**विद्यावेतन** : २,००० प्रति महिना
**पात्रता** : संवाद कौशल्य, एक्सेल आणि गूगल शीट्सचे मूलभूत ज्ञान, आणि सॉफ्ट स्किल्स
**शेवटची तारीख** : ३१ मे, २०२६
**अर्ज कसा करावा** : तुम्ही ऑनलाइन अर्ज करू शकता.
**वेबसाइट** : tinyurl.com/39xu5m8n

## जॉब ALERT




### सीएससी नोकरीच्या संधी (१२० पदे)

आधार सुपरवायझर आणि ऑपरेटर पदांसाठी रिक्त जागा
**शेवटची तारीख** : २० मे, २०२६
**पात्रता** : १०वी-१२वी, आयटीआय आणि इतर शैक्षणिक अर्हता.
**येथे अर्ज करा** : csc.gov.in

### भारतीय रिझर्व्ह बँकेत संधी (६० पदे)

ग्रेड बी अधिकारी पदांसाठी रोजगाराच्या संधी
**शेवटची तारीख** : २० मे २०२६
**वयोमर्यादा** : किमान २१ वर्षे आणि कमाल ३० वर्षे
**येथे अर्ज करा** : ibpsreg.ibps.in/rbisbmar26/

### महानदी कोलफिल्ड्मध्ये भरती (५०० पदे)


सहाय्यक फोरमन आणि इतर पदांसाठी रिक्त जागा
**शेवटची तारीख** : २८ मे २०२६
**वयोमर्यादा** : किमान १८ वर्षे आणि कमाल ३० वर्षे
**येथे अर्ज करा** : mahanadicoal.in

### वन संशोधन संस्था अर्ज आमंत्रित (९१ पदे)

तांत्रिक सहाय्यक, वनरक्षक आणि इतर पदांसाठी रिक्त जागा
**शेवटची तारीख** : ३ जून, २०२६
**पात्रता** : १०वी-१२वी आणि इतर आवश्यक पात्रता
**येथे अर्ज करा** : fri.icfre.gov.in

## यशस्वी होण्यासाठी वेळेचे व्यवस्थापन

STUDY TIPS



यशस्वी जीवनाचे मूळ सूत्र हे वेळेच्या व्यवस्थापनात दडलेले आहे. जीवनातील एकही क्षण व्यर्थ घालवता कामा नये. शक्य तितक्या प्रत्येक मिनिटाचा, क्षणाचा आपल्या आयुष्यात वापर करायला हवा. प्रत्येक माणसाला वेळेची किंमत असायला हवी. वेळेचे महत्त्व समजून घेऊन जीवनात यशस्वी होण्यासाठी खालील मुद्द्यांचा अवलंब करू शकता.

**वेळेचे नियोजन** : तुमच्या दिवसाची सुरुवात करण्यापूर्वीच तुमच्या कामांचे योग्य नियोजन करा. कोणत्या कामाला प्राधान्य द्यायचे हे ठरवणे महत्त्वाचे आहे.

**ध्येय निश्चिती** : ध्येय ठरवा आणि ते पूर्ण करण्यासाठी वेळेचे विभाजन करा. असे केल्याने ताणतणाव कमी होतो.

**व्यसनांचा त्याग करा** : सोशल मीडिया किंवा नको त्या गोष्टींमध्ये वेळ वाया घालवण्याऐवजी, तो वेळ नवीन कौशल्ये शिकण्यासाठी किंवा स्वतःच्या प्रगतीसाठी वापरा.

## आपले ASTRO

### आजचे पंचांग

**तिथी : संवत्सर**

राष्ट्रीय मिती २९, शके १९४८, विक्रम संवत्सर २०८३, उत्तरायण ग्रीष्म ऋतू, अधिक ज्येष्ठ शुक्ल पक्ष तृतीया १४:१९, नंतर चतुर्थी

**ता : १९- ५ -२०२६, मंगळवार**

**सूर्योदय** : ५:४६, **सूर्यास्त** : ६:५१

**सूर्योदयकालीन नक्षत्र** : मृगशिरा ८:४१, नंतर आर्द्रा, योग-धृति १७:४९, नंतर शूल, करण- गरज १४:१९, नंतर वणिज २४:३९, पश्चात विष्टी

**शुभ दिवस** : आज दिवस शुभ आहे

**ग्रह गोचर** : सूर्य - वृषभ, चंद्र-मिथुन, मंगळ - मेष, बुध -वृषभ, गुरू -मिथुन, शुक्र -मिथुन, शनी - मीन, राहु - कुंभ, केतू - सिंह

**भद्रा** : रात्री १२:३९ वाजता प्रारंभ

**राहुकाळ** : दुपारी ३:०० ते ४:३०

**दिशा शूल** : उत्तर व वायव्य

**आराधना** : श्री हनुमानाची पूजा व आराधना

**उपासना** : कर्जमुक्ती, कुटुंबपीडा व संकटनिवारण हेतू उपवास व उपासना

**खरेदीसाठी शुभ वेळ** : आज प्रातःपासून रात्रीपर्यंत मृग व आर्द्रा नक्षत्र आहे, जी खरेदीसाठी शुभ वेळ नाही.

**शुभ अंक** : ९,३,६




**शुभ रत्न** : मंगळासाठी मूंगा, प्रवाळ

**शुभ रंग** : गडद किंवा गुलाबी लाल

**ग्रह पीडा हरण मंत्र** : मंगळ ग्रह भूमिपुत्रो महातेजा जगतां भयकृत सदा। वृष्टिकृत वृष्टिहर्ता च पीड़ां हरतु मे कुजः।।

**चौघड़िया मुहूर्त**

**दिन** - रोग - प्रातः६:००, उद्वेग-७:३०, चंचल - ९:००, लाभ - १०:३०, अमृत - दु.१२:००, काळ - १:३०, शुभ - ३:००, रोग - सायं ४:३०

**रात्री** - काळ - ६:००, लाभ - ७:३०,उद्वेग - ९:००, शुभ - १०:३०, अमृत - १२:००, चंचल - १:३०, रोग - ३:००, काळ - प्रातः ४:३०

**शुभ मुहूर्त** : शुभ, लाभ, अमृत, चंचल

**अशुभ मुहूर्त** : रोग, काळ

**मध्यम मुहूर्त** : उद्वेग

### आज ज्यांचा जन्मदिवस आहे

वर्षाच्या सुरुवातीला शिक्षणात अनास्था आणि व्यत्यय येईल. तुम्हाला एखाद्या अधिकाऱ्याच्या रोषाला सामोरे जावे लागू शकते. मित्रांसोबत वैचारिक मतभेद होतील. वर्षाच्या मध्यावर, प्रियजनांच्या पाठिंब्यामुळे तुमच्या कामात यश मिळेल. तुम्हाला शासकीय अधिकाराचा फायदा होईल. नवीन प्रकल्पांमध्ये भांडवल गुंतवले जाईल.

मेष आणि वृश्चिक राशीच्या लोकांना शारीरिक अस्वस्थता जाणवू शकते. वृषभ आणि तूळ राशीच्या लोकांना पाठिंबा मिळेल. सिंह राशीच्या लोकांना खाजगी क्षेत्रात रस वाटेल. मकर आणि कुंभ राशीच्या लोकांना त्यांच्या वरिष्ठांच्या आदेशांचे पालन करावे लागेल. धनु आणि मीन राशीचे लोक धार्मिक यात्रेला जातील. मिथुन आणि कन्या राशीच्या लोकांना अनपेक्षित आर्थिक लाभ मिळू शकतो.

### व्यापार भविष्य

अधिक ज्येष्ठ महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या तृतीयेला मृगशिरा नक्षत्राच्या प्रभावामुळे जव, हरभरा, तूर, मूग, मटक, उडीद, ज्वारी, बाजरी, मका, हळद, एरंडेल तेल, तीळ आणि तेल यांच्या किमती वाढतील. ज्या वस्तूच्या किमती आजच्या दरांपेक्षा जास्त तिच्या किमतीत घसरण होईल. **भाग्यांक ६२८२**

### आज जन्मलेल्या बालकाचे भविष्य

आज जन्माला येणारे बालक बुद्धिमान, तेजस्वी, धाडसी आणि धाडसी असेल. त्यांचे शिक्षण चांगले असेल. तो नोकरीत आणि राजकीय प्रयत्नांमध्ये यश मिळवणारा असेल. तबालक शिस्तप्रिय आणि नेतृत्वाची भावना असलेले असेल. बालक आयुष्यभर पालकांची सेवा करेल.

### SUDOKU ७३९३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 5 | | | 3 | | | |
| | 2 | | | 9 | 5 | | | |
| 9 | | | | | | 6 | | |
| | | | | | | | 3 | 5 |
| | 6 | | | | | | 7 | |
| 4 | 8 | | | | | | | |
| | | 7 | | | | | | 3 |
| | | | 2 | 4 | | | 9 | |
| | | | 8 | | | 2 | | |

MANGAL SENACHA, BANGALORE

प्रत्येक ओळीत १ ते ९ अंक भरणे आवश्यक आहे. मात्र हे अंक क्रमवार असणे अनिवार्य नाही. उभ्या आणि आडव्या ओळींमध्ये ३३३ च्या वर्गात असावेत, अंकांची पुनरावृत्ती नको.
आधीच्या अंकांच्या जागा बदलू शकत नाही. शून्य कोड्याचे एकच उत्तर आहे.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 2 | 5 | 8 | 6 | 1 | 9 | 7 | 3 |
| 7 | 3 | 1 | 9 | 4 | 2 | 8 | 5 | 6 |
| 6 | 9 | 8 | 7 | 3 | 5 | 4 | 2 | 1 |
| 1 | 6 | 2 | 3 | 8 | 9 | 5 | 4 | 7 |
| 9 | 4 | 3 | 5 | 1 | 7 | 6 | 8 | 2 |
| 8 | 5 | 7 | 4 | 2 | 6 | 3 | 1 | 9 |
| 2 | 1 | 9 | 6 | 5 | 8 | 7 | 3 | 4 |
| 5 | 7 | 4 | 1 | 9 | 3 | 2 | 6 | 8 |
| 3 | 8 | 6 | 2 | 7 | 4 | 1 | 9 | 5 |

### आजचे राशीफळ

ज्योतिषाचार्य पं.नारायणशंकर नाथुराम व्यास-कोतवाली बाजार, जबलपूर

**मेष** : जुन्या मैत्री उपयोगी पडतील. शुभ प्रसंगी खर्च होईल. काम अपेक्षेप्रमाणे पुढे जाईल. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च होण्याची शक्यता आहे. तुमची एका प्रिय व्यक्तीशी भेट होईल.

**वृषभ** : कामाच्या ठिकाणी सुव्यवस्था राखण्यासाठी तुम्हाला कठोर परिश्रम करावे लागतील. खूप मेहनत करावी लागेल. पाहुणे येण्याची शक्यता आहे. वैयक्तिक कामांचे नियोजन केले जाईल.

**मिथुन** : मतभेदांमुळे नोकरी सोडण्याचा विचार मनात येईल. संयम बाळगा. उच्च पदस्थ मान्यवरांशी तुमचा संपर्क वाढेल. मित्र मदत करतील. तुमचे आरोग्य चांगले राहील.

**कर्क** : आरोग्य सुधारेल. धार्मिक आवड वाढेल. राजकारण्यांशी संपर्क वाढेल. मेहनतीचे फळ मिळेल. काळजीपूर्वक काम करणे फायदेशीर ठरेल. तुम्हाला तुमच्या वडिलांकडून आनंद मिळेल. मित्र मदत करतील.

**सिंह** : बांधकाम कामात प्रगती होईल. दैनंदिन दिनचर्या नियमित राहील. खूप दिवसांपासून न भेटलेल्या मित्राबद्दल चांगली बातमी मिळेल. अपेक्षित यश मिळेल.

**कन्या** : भौतिक सुखसोयी वाढतील. नफ्याबद्दल समाधान मिळेल. आजारी व्यक्तीबद्दल चिंता वाटेल. तुमच्या व्यवसायाच्या परिस्थितीनुसार निर्णय घ्या. घरी पाहुण्यांचे आगमन होवू शकते.

**तूळ** : तुमचे विरोधकसुद्धा सहकार्य करण्यास तयार असतील. आरोग्य सुधारेल. तुम्ही मित्र आणि कुटुंबासोबत निसर्गरम्य स्थळाला भेट द्याल. तुम्ही कौटुंबिक कामांमध्ये व्यस्त राहाल.

**वृश्चिक** : क्षुल्लक कारणावरून तुमचा मित्रांशी वाद होऊ शकतो. तुम्हाला खूप प्रयत्न आणि कठोर परिश्रम करावे लागतील. हरवलेल्या वस्तू सापडतील.

**धनु** : शत्रूंचा पराभव होईल. उत्पन्न वाढेल. तुम्हाला वेळेवर आणि चांगले जेवण मिळेल. भौतिक सुखसोयी वाढतील. प्रियजनांसोबतचा संवाद वाढेल. मानसिक आनंद आणि समाधान मिळेल.

**मकर** : सामाजिक कार्यात तुमची प्रतिष्ठा वाढेल. धार्मिक यात्रेची शक्यता आहे. कठोर परिश्रम आणि प्रयत्नांमुळे पुरेसे यश मिळेल. मान आणि सन्मान वाढेल. महत्त्वाची कामे पूर्ण होण्याची शक्यता आहे.

**कुंभ** : करिअरमधील यशासाठी योग्य वेळ आली आहे. तुम्ही कौटुंबिक बाबतीत यशस्वी व्हाल. तुम्हाला व्यवसायाच्या बाबतीत पाठिंबा मिळेल. मुलांची भरभराट होईल. त्यांना मिळालेले यश पाहून समाधानी व्हाल.

**मीन** : वाहन चालवताना काळजी घ्या. वैयक्तिक जबाबदाऱ्या पूर्ण होतील. इतरांवर जास्त अवलंबून राहू नका. संयमाने वागणे फायदेशीर ठरेल.

### शब्दकोडे क्र. 3096



**आडवी विधाने:–** 1) वाल्मीकी ऋषींनी लिहिलेले महाकाव्य 3) XXXX महादेव, मराठ्यांची गर्जना 5) साक्षीदाराने न्यायालयात दिलेली जबानी 6) एक पक्षी 7) गाठ सरकविता येऊन लहान – मोठा करता येईल असा फास 10) दयाळू 11) सलगी किंवा जवळीक साधणे 13) सेवक किंवा भक्त यांचा समूह 14) मनोभावे केलेली आराधना 15) इंग्रजी वर्षातील एक महिना 16) काळोख 17) क्षणिक, चंचल 18) पशु पक्षांना पकडणारा 19) डोंगरी किल्ला 20) काळ, वेळ, प्रसंग 22) लहान मुलांचा मुका 23) पुतळ्या व मणी यांची माळ 25) व्यर्थ जाणे येणे 27) सूर्य विषयक 28) सन्मान, महत्व, मोठेपणा

**उभी विधाने:–** 1) मनुष्याच्या जन्मकाळच्या ग्रहस्थितीवरुन पडण्यात येणाऱ्या गणांपैकी तिसरा गण 2) एक शब्दालंकार 3) हरण करणारा, शिव 4) जुलूमाने दुसऱ्याकडून काढलेले द्रव्य जसे आले तसे लवकर नाहिसे होते (वाक्प्रचार) 6) तोंडात घेण्यात येणारा अन्नाचा गोळा 8) एक सारखे तेच ते बोलणे 9) फासे लावून पक्षुपक्षी पकडणारा 11) भिजविलेला व मळलेला पदार्थाचा गोळा 12) कापडाची वाटेल तेव्हा काढण्यात येणारी भिंत, पडदा 14) परत करण्याच्या बोलीवर घेतलेली वस्तू 16) क्रिकेटमधील पंच 21) पाण्यात राहून विश्रांतीसाठी जमिनीवर येणारा एक जीव 22) पल्लव, पदर 24) जिंकणे, विजय 25) जासूद, गुप्त बातम्या काढणारा 26) भजनात वाजविण्यात येणारे एक वाद्य (उत्तर पुढील अंकी)

मागील शब्दकोड्याचे उत्तर



anumeya -8446302691

दैनिक बोल नाशिक
प्रत्येक बातमीचा नि:पक्ष खुलासा



## महत्वाचे...



### नंदुरबार वनविभागाचा स्तुत्य उपक्रम; जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

दैनिक बोल नाशिक

**नंदुरबार ।** जंगल, जमीन आणि पाणी' हेच आपल्या अस्तित्वाचे आधार आहेत, त्यांची जपणूक करणे ही प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे, असा संदेश देत बिलगाव प्रादेशिक वनक्षेत्रातर्फे जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. भुषा परिमंडळातील नियतक्षेत्र साव-या येथील मौजे साव-यादिगर येथे आयोजित या कार्यक्रमात वृक्षारोपण आणि पर्यावरण रक्षणाची शपथ घेण्यात आली.

**पर्यावरण रक्षणाचा संकल्प:**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साव-याचे सरपंच दिलीप पावरा होते. कार्यक्रमाची सुरुवात करताना वनरक्षक अरुण निकम यांनी पर्यावरण दिनाचे महत्त्व विशद केले. त्यांनी प्लास्टिकचा अतिवापर, रासायनिक खते आणि कीटकनाशकांमुळे पर्यावरणाचे होणारे अपरिमित नुकसान यावर उपस्थितांना सतर्क केले. वनपाल प्रतिभा बोरसे यांनी परिसंस्थेतील जैविक घटकांचे महत्त्व पटवून देताना 'जंगल आणि वणवा' या विषयावर जनजागृती करणारे गीत सादर केले.

**पुढच्या पिढीला जंगल केवळ मोबाईलमध्ये दिसेल**

बिलगावचे वनक्षेत्रपाल लक्ष्मीकांत शेंडगे यांनी आपल्या भाषणात वाढत्या तापमानावर आणि हवामान बदलावर चिंता व्यक्त केली. त्यांनी स्पष्ट केले की, मानवी हस्तक्षेप कमी झाला तर जंगल निसर्गतः बहरते. वृक्षतोड अशीच सुरू राहिली, तर भविष्यात आपल्या मुलांना जंगल पाहण्यासाठी केवळ मोबाईलचा आधार घ्यावा लागेल



### शिरपूर शहरातील खाद्यपदार्थ सह आईस्क्रीम व्यवसायावर नागरिकांची कारवाईची मागणी

दैनिक बोल नाशिक

**शिरपूर ।** उत्तर महाराष्ट्रातील शैक्षणिक केंद्र म्हणून झपाट्याने विकसित होत असलेल्या शिरपूर शहरात अन्नसुरक्षा आणि खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांसह मध्यप्रदेश, गुजरात आणि इतर राज्यांतून हजारो विद्यार्थी शिक्षणासाठी शिरपूरमध्ये दाखल होत असल्याने शहराची लोकसंख्या आणि व्यावसायिक उलाढाल मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मात्र, वाढत्या व्यवसायासोबतच अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात असून अन्न व औषध प्रशासन विभागाने विशेष तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त म्हणून तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर राज्यभर धडक कारवाईचे सत्र सुरू केले आहे. अवैध गुटखा, निकृष्ट दर्जाचे खाद्यपदार्थ, बनावट उत्पादनांची विक्री आणि नियमबाह्य व्यवसाय करणाऱ्यांवर सुरू असलेल्या कारवाईमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. त्याच पार्श्वभूमीवर शिरपूर शहरातील करंज नाका परिसरातील बरका आईस्क्रीम विक्रेत्यांच्या चौकशी करण्याची मागणी आता पुढे येत आहे. शहरातील करवंद नाका, निमझरी नाका तसेच इतर प्रमुख भागांमध्ये परप्रांतीय व्यावसायिकांकडून कोल्ड्रिंक्स, आईस्क्रीम, मिठाई आणि विविध खाद्यपदार्थांची दुकाने मोठ्या प्रमाणात चालविली जात आहेत. या दुकानांमध्ये विक्री होणाऱ्या पदार्थांची गुणवत्ता, वापरण्यात येणारा कच्चा माल, उत्पादन व साठवणुकीची पद्धत, स्वच्छता आणि आवश्यक परवान्यांची पूर्तता याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. सामाजिक कार्यकर्ते आणि काही नागरिकांच्या मते, विद्यार्थी आणि सर्वसामान्य ग्राहक मोठ्या प्रमाणात या दुकानांवर अवलंबून असल्याने अन्नसुरक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन होत आहे की नाही, याची खात्री करणे आवश्यक आहे. विशेषतः उन्हाळ्यात आणि पावसाळ्यात आईस्क्रीम, थंड पेये व मिठाई यांसारख्या पदार्थांच्या गुणवत्तेचा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. निकृष्ट दर्जाचे किंवा दूषित खाद्यपदार्थ नागरिकांच्या आरोग्यासाठी गंभीर धोका निर्माण करू शकतात. नागरिकांनी अन्न व औषध प्रशासन विभागाकडे करवंद नाका आणि निमझरी नाका परिसरातील संशयित खाद्यपदार्थ विक्री केंद्रांची तपासणी करून नमुने प्रयोगशाळेत पाठविण्याची मागणी केली आहे. नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशीही अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शिरपूर हे शिक्षण, उद्योग आणि व्यापाराच्या दृष्टीने वेगाने विकसित होत असताना शहरातील नागरिकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. त्यामुळे अन्न व औषध प्रशासन विभागाने विशेष मोहीम राबवून खाद्यपदार्थ विक्री केंद्रांची तपासणी करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करून ग्राहकांचा विश्वास कायम ठेवावा, अशी मागणी आता अधिक तीव्र होत आहे.

# सुरगाणा तालुक्यातील भागात ड्रोनद्वारे आरोग्य सेवा वितरण उपक्रमाची चाचणी परीक्षण

दैनिक बोल नाशिक

**सुरगाणा । प्रतिनिधी**

तालुक्यातील दुर्गम, अतिदुर्गम सीमावर्ती आदिवासी भागात तसेच भौगोलिकदृष्ट्या आव्हानात्मक भागांतील नागरिकांना वेळेत आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे ही शासनाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. ड्रोन तंत्रज्ञानामुळे औषधे, लसी आणि वैद्यकीय साहित्य जलदगतीने दुर्गम भागात पोहोचणार असून आरोग्य सेवा वितरण व्यवस्थेत नवा आमुलाग्र बदल घडून येईल या मुळे आदिवासी समाज बांधवांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

नाशिक जिल्ह्यातील अतिदुर्गम भागांसाठी अति जलद गतीने आरोग्य सेवा पोचवणे करीता सुरू करण्यात आलेल्या ड्रोनद्वारे आरोग्य सेवा वितरण प्रकल्पाची परिक्षण चाचणी सुरगाणा तालुक्यातील अतिदुर्गम सीमावर्ती भागातील खिर्डी, भाटी, पिंपळसोंड हा अतिदुर्गम व भौगोलिकदृष्ट्या अडचणीचा, डोंगरद-या, घाट वळणाचा असून आव्हानात्मक आहे.पावसाळ्यात फरशी वरुन पुराचे पाणी वाहणे,दरड कोसळणे,सर्प दंश,अपघात, महापुर आदी नैसर्गिक आपत्ती मुळे याभागांतील नागरिकांना वेळेवर उपचार मिळत नाहीत. यावर मात करण्यासाठी अतिजलद आणि प्रभावी आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी हा महत्त्वपूर्ण उपक्रम साकारण्यासाठी जिल्हा प्रशासन, तालुका आरोग्य विभाग तसेच आयआयटी मुंबई यांच्या तांत्रिक सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येणार असून या प्रकल्पाची ड्रोन चाचणी परिक्षण नुकतेच तज्ञ टीमकडून करण्यात आले. ड्रोन चाचणी यशस्वी झाल्यास आरोग्य सेवा वितरण व्यवस्थेत आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर होणार आहे,

या अभिनव उपक्रमामुळे दुर्गम भागांमध्ये औषधे,लसी, वैद्यकीय साहित्य तसेच प्रयोगशाळा तपासणीसाठी आवश्यक नमुने, कृषी, आरोग्य, शिक्षण, दळणवळण, नेटवर्क आदी अत्यावश्यक सेवा अल्पावधीत पोहोचविणे शक्य होणार असून आरोग्य सेवा अधिक गतिमान आणि परिणामकारक होणार आहे. प्रारंभी प्रायोगिक तत्त्वावर सुरगाणा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र अंबोडे ते खिर्डी, भाटी, उंबरठाण, पांगारणे ते पिंपळसोंड, उंबरपाडा, तातापाणी या सुमारे १० ते १२ किलोमीटर अंतराच्या मार्गावर ड्रोन सेवा सुरू करण्याची चाचणी घेण्यात आली आहे. या सेवेचा लाभ सुरगाणा तालुक्यातील खिर्डी, भाटी, पिंपळसोंड भागातील सुमारे २० ते २५ गावातील पंचवीस ते तीस हजार नागरीकांना या सेवेचा लाभ मिळणार आहे.या उपक्रमामुळे नाशिक जिल्ह्यातील दुर्गम, अतिदुर्गम,सीमावर्ती भागातील आरोग्य सेवा वितरण व्यवस्थेला नवी गती मिळणार असून आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आरोग्य क्षेत्रात नव्या पर्वाची सुरुवात होणार आहे.





> ड्रोन द्वारे आमच्या अतिदुर्गम भागात वेळेवर आरोग्य सेवा पुरविण्यासाठी आमच्या सीमावर्ती अतिदुर्गम गावात हा उपक्रम यशस्वी झाला तर निश्चितपणे आम्हाला दिलासा मिळणार असून अंबिका,कावेरी,तान,मान,नार,पार यांना पुराचे पाणी वाहत असल्यामुळे रुग्णालयात उपचारासाठी दाखल होता येत नव्हते.आच पर्यंत उपचारा अभावी सर्पदंशाने कित्येकांचा जीव डोळ्यासमोर गेला आहे. औषधां अभावी बळी पडले आहेत.हे निरपराध जीव वाचवण्यासाठी शासनाने सुरू केलेल्या उपक्रमाचे स्वागत आहे.
> - शिवराम चौधरी माजी सैनिक पिंपळसोंड.

> पावसाळ्यात अतिवृष्टी, संततधार, रस्ते पुलां अभावी पाण्याखाली जाणे, या नैसर्गिक आपत्तीमुळे तालुक्यातील काही गावांचा संपर्क विशेषतः पावसाळ्यात तालुक्यांशी तुटतो यामुळे शासनाने या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी केल्यास आरोग्य सेवेचा लाभ नागरिकांना मिळेल.
> - डॉ.कश्मिरा संखे सहायक जिल्हाधिकारी,कळवण

> तालुका हा भौगोलिक दृष्ट्या अडचणीचा आहे.ड्रोन सेवा उपलब्ध झाल्यावर नैसर्गिक आपत्ती निवारण करणे नियंत्रण कक्षास सोपे जाईल. नागरिकांना अतिजलद व वेळेत उपचार मिळेल. शासनाच्या या अभिनव उपक्रमामुळे दुर्गम भागातील नागरिकांना दिलासा मिळेल.
> - रामजी राठोड तहसीलदार सुरगाणा

## प्रतिबंधित गुटखा, पानमसाला विक्रेत्यांवर एफडीएची कारवाई

### दोन कोटी किंमतीचा गुटखा केला जप्त

दैनिक बोल नाशिक

**मुंबई । प्रतिनिधी**

अन्न आणि औषध प्रशासन विभागाने (एफडीए) गुटखा मुक्त महाराष्ट्र मोहीम हाती घेतली आहे. याअंतर्गत राज्यभरात करण्यात आलेल्या कारवाईत गुटखा, पानमसाला विक्रेत्यांना लक्ष्य करण्यात आले असून १९५ ठिकाणी टाकण्यात आलेल्या धाडीत १९२ जणांना अटक करण्यात आली आहे. राज्यभरातून सुमारे १ कोटी ९९ लाख १८ हजार ४७५ कोटींचा गुटखा, पानमसाल्याचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला आहे. अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी यासंदर्भात निर्देश दिल्यानंतर धाराशीव, धुळे, नांदेड, पुणे, मुंबईसह अन्य ठिकाणी धाडसत्र हाती घेत मोठ्या कारवाया केल्या. यामध्ये धाराशीव येथील परांडा येथे करण्यात आलेल्या कारवाईत १ कोटी दोन लाख ६७ हजारांचा साठा जप्त करण्यात आला. समृद्धी महामार्गावर सावंगी टोलनाका येथे घालण्यात आलेल्या धाडीत ६० लाख ५० हजार रुपयांचा माल जप्त करण्यात आला. त्याचप्रमाणे महाराष्ट्र - तेलंगणा सीमा भाग, नांदेड, येथे करण्यात आलेल्या कारवाईत १७ लाख ५२ हजार रुपये किमतीचा माल आणि वाहने जप्त करण्यात आली. पिंपरी-चिंचवड येथील मोशी येथे करण्यात आलेल्या कारवाईत ६ लाख १९ हजारांचा माल जप्त करण्यात आला असून ६ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राज्यात प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या अवैध उत्पादन, साठवणूक, वाहतूक, विक्रीस आळा घालण्यासाठी अन्न आणि औषध प्रशासनाकडून कठोर कारवाई करण्यात येत असून यापुढेही ही कारवाई सुरू राहणार आहे. गुटखा मुक्त महाराष्ट्र, निरोगी महाराष्ट्र ही मोहीम केवळ कायदेशीर कारवाई नसून महाराष्ट्रातील नागरिकांच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी सुरू असलेली निर्णायक लढाई आहे. जनतेच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांविरोधात सरकारने आता शून्य सहनशीलता धोरण स्वीकारले असल्याची माहिती तुकाराम मुंढे यांनी दिली.

> **विभागनिहाय कारवाया**
> कोकण विभाग - ७९ धाडी, ७८ जणांना अटक, पुणे विभाग - ५२ धाडी, ५२ जणांना अटक, मुंबई - १५ धाडी, ३० जणांना अटक, नागपूर - ८ धाडी, ८ जणांना अटक, छत्रपती संभाजीनगर - ९ धाडी, ८ जणांना अटक, अमरावती - २ धाडी, १ अटकेत

## लोककलावंत सांस्कृतिक विचार मंचाचे संस्थापक अध्यक्ष गवनेरजी सरोदे यांच्या नेतृत्वाखाली शिर्डीत भव्य लोककलावंत महामेळावा

दैनिक बोल नाशिक

**शिर्डी । प्रतिनिधी**



महाराष्ट्राच्या समृद्ध लोककला, लोकसंस्कृती आणि ग्रामीण परंपरांचे दर्शन घडविणारा भव्य लोककलावंत महामेळावा व लोककलावंत सन्मान सोहळा नुकताच शिर्डी येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांच्या सहकार्याने आणि लोककलावंत सांस्कृतिक विचार मंच, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित या सोहळ्यात राज्यभरातील तब्बल आठ हजारांहून अधिक लोककलावंतांनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी साईबाबांच्या चरणी काढण्यात आलेल्या भव्य प्रभात फेरीने झाली. या फेरीत हजारो महिला व पुरुष कलावंतांनी पारंपरिक वेशभूषेत सहभाग घेत लोककलेचा जागर केला. त्यानंतर शिर्डी संस्थानच्या शताब्दी मंडप सभागृहात लोककला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवात आदिवासी नृत्य,पारंपरिक लोकनृत्य, सनई-संबळ वादन, बँड पथक, भारूड, पोवाडे, तमाशा आदी विविध लोककला प्रकारांचे सादरीकरण करण्यात आले. कलाकारांच्या दमदार सादरीकरणाने उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. सभागृहात एवढी गर्दी झाली. होती की बसण्यासाठीही जागा उपलब्ध नव्हती.

लोककलावंत सांस्कृतिक विचार मंचाचे संस्थापक अध्यक्ष गवनेर सरोदे व यांच्या खांद्याला खांदा लावून काम त्याच्या बरोबर उभ्या असणाऱ्या निर्मला सरोदे यांनी ग्रामीण आणि दुर्गम भागातील उपेक्षित कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून केलेल्या अथक प्रयत्नांचा यावेळी गौरव करण्यात आला. त्यांच्या नेतृत्वाखाली आज संघटनेत सुमारे पन्नास हजार लोककलावंत कार्यरत असून महाराष्ट्रातील लोककला संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण कार्य सुरू आहे.

ग्रामीण भागातील अनेक उत्कृष्ट कलाकारांना योग्य संधी मिळत नसल्याने त्यांची कला लोप पावण्याच्या मार्गावर आहे. ही बाब लक्षात घेऊन सरोदे यांनी गावागावांत, तालुक्यांत आणि जिल्ह्यांत लोककलावंतांचे मजबूत जाळे उभे केले असून त्यांच्या कलेला नवे व्यासपीठ मिळवून दिले आहे. त्यामुळे लोककलेच्या जतन व संवर्धनाला मोठी चालना मिळाली आहे.

कार्यक्रमा दरम्यान लोककलावंतांचा सत्कार करण्यात आला तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या कलाकारांना श्री साई जीवन गौरव पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. शिर्डी संस्थानच्या अधिकाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष सहकार्य केल्याबद्दल संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गवनेर सरोदे यांचा सत्कार करण्यात आला. शिर्डी मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे हे प्रत्यक्ष उपस्थित राहू शकले नसले तरी त्यांनी दूरध्वनीद्वारे आयोजक व कलावंतांना शुभेच्छा दिल्या. लोककलावंतांच्या प्रश्नांसाठी आपण सदैव तत्पर असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भांगरे यांनी केले, तर सूत्रसंचालन मंगेश फाटकर यांनी केले. आभार प्रदर्शन संपादक पोपट सोनवणे यांनी मानले.

हा महामेळावा यशस्वी करण्यासाठी गवनेर सरोदे, सर्जे राव कदम, नवनाथ राक्षे, रवींद्र वाकोडे, धोंडीराम दिवे, राजू मंतोडे, ज्ञानेश्वर गांगड, दिलीप पवार , मच्छिंद्र आसवले, ललित धनगर ,नारायण पथवे, विमल डोंगरे,सोमा आसवले, अनिल सोनवणे, मारुती आसवले तसेच अन्याय अत्याचार विरोधी युवा व महिला संघटना आणि हजारो महिला-पुरुष कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. लोककलेचा वारसा जपत ग्रामीण कलाकारांना नवे बळ देणारा हा महामेळावा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात एक संस्मरणीय पर्व ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# नाफेड आणि एनसीसीएफ बाजार समित्यांमधून कांदा खरेदी करणार

## जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीत मोठा निर्णय

### सोमवारपासून होणार प्रक्रियेला सुरुवात

दैनिक बोल नाशिक

**देवळा । प्रतिनिधी**

येत्या सोमवारपासून नाफेड व एनसीसीएफमार्फत होणारी कांदा खरेदी १०० टक्के कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातच करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे नाशिक जिल्ह्यातील हजारो कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष बैठकीत पीएसएफ कांदा अभियान २०२६-२७ अंतर्गत नाफेड आणि एनसीसीएफमार्फत बाजार समित्यांमध्ये करण्यात येणाऱ्या कांदा खरेदीचा आढावा घेण्यात आला. या बैठकीस मंत्री छगन भुजबळ, दादा भुसे, नरहरी झिरवाळ, खासदार भास्कर भगरे, आमदार डॉ. राहुल आहेर, हिरामण खोसकर, दिलीप बोरसे यांच्यासह नाफेड, एनसीसीएफ तसेच बाजार समित्यांचे पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत नाफेडने तत्काळ कांदा खरेदी सुरू करावी. त्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून घ्याव्यात. तसेच कांदा खरेदीचे दिलेले उद्दिष्ट पूर्ण करावे. जिल्ह्यात शेतकरी मोठ्या प्रमाणात कांद्याचे उत्पादन घेतात. नाफेडने जिल्ह्यातील सर्व बाजार समित्यांमध्ये कांदा खरेदी केंद्र सुरू करावे. खरेदी केलेला कांदा गोदामापर्यंत वाहतूक आणि मजुरीचा खर्च नाफेडने करावा. कांदा उत्पादक शेतकऱ्यांची गैरसोय होणार नाही, याची दक्षता खरेदीदारांनी घ्यावी. नाफेडने निश्चित केलेल्या दराने आणि दिलेल्या उद्दिष्टानुसार कांदा खरेदी करावा. त्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी. बाजार समितीत कांदा खरेदीबाबत दिशादर्शक फलक लावावेत. त्यासाठी बाजार समिती सर्वतोपरी सहकार्य करतील. शक्य तेवढ्या लवकर कांदा खरेदीचे उद्दिष्ट साध्य करावे, असे सांगण्यात आले. खरेदी केलेल्या कांद्याचे पैसे शेतकऱ्यांना ७२ तासांत अदा करावेत. नाफेड किंवा एनसीसीएफमध्ये ग्रेडिंगच्या नावाखाली माल निकृष्ट दर्जाचा दाखवून खरेदी नाकारली जाते, अशी शेतकऱ्यांची तक्रार असते. यावर उपाय म्हणून आता यंत्रसामग्रीच्या माध्यमातून ग्रेडिंग करावे. तसेच नाफेडने कांदा खरेदी प्रक्रिया पूर्ण करावी. त्यासाठी अंमलबजावणी संस्थांना सर्वतोपरी सहकार्य केले जाईल. कांदा खरेदी प्रक्रियेतील वाद निवारण्यासाठी कृषी, पणन आणि महसूल विभागातील प्रत्येकी एक अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येईल. कांदा खरेदी बाबत एकही तक्रार येणार नाही, याची दक्षता खरेदी करणाऱ्या संस्थेने घ्यावी, असेही या बैठकीत सांगण्यात आले.



**भुजबळ काय म्हणाले?**

या बैठकीत मंत्री भुजबळ यांनी शेतकरी हिताच्या या निर्णयाला जोड देत पणन विभागाने कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात होणाऱ्या या खरेदीवरील बाजार शुल्कात संपूर्ण सूट देण्यात यावी. तसेच नाफेड आणि एनसीसीएफने कांदा खरेदी प्रत्यक्ष शेतकरी बांधवांकडूनच करावी, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले. त्याचबरोबर शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचा मोबदला वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने मिळावा या उद्देशाने कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये तातडीने कांदा खरेदी केंद्र सुरू करण्याच्या सूचना करण्यात आल्या. तसेच खरेदी प्रक्रियेत अचूकता आणि पारदर्शकता वाढवण्यासाठी कांदा ग्रेडिंग व सॉर्टिंग मशीनचा वापर करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणेला देण्यात आले. तर कांदा उत्पादकांना न्याय मिळावा यासाठी गरजेनुसार कांदा खरेदीचा लक्षांक वाढवून मिळण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला जाईल, असेही यावेळी सांगण्यात आले.

केंद्र शासनाने राज्याला २ लाख मेट्रिक टन कांदा खरेदीचे उद्दिष्ट दिले असून, १ जून २०२६ पर्यंत १५.५० लाख क्विंटल (१.५५ लाख मेट्रिक टन) कांदा खरेदी झाल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी मंजूर करण्यात आलेले उद्दिष्ट वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधित संस्थांनी खरेदी प्रक्रियेला अधिक वेग देत ३० जून २०२६ पर्यंत उद्दिष्ट पूर्ण करावे, असे आदेश देण्यात आले. तसेच मागील महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे चांगल्या दर्जाच्या साठ्यातही 'ग्रेड-ए' खालील कांद्याचे प्रमाण वाढल्याने खरेदी प्रक्रियेत तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या होत्या. ही बाब लक्षात घेऊन केंद्र शासनाने 'ग्रेड-१' कांद्याच्या निकषांमध्ये विशेष शिथिलता दिली आहे. गुणवत्ता तपासणी प्रक्रियेत नकारात्मक छाननी करून शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या स्पष्ट सूचना सीडब्ल्यूसी आणि निरीक्षण संस्थांना मंत्री भुजबळ यांनी दिल्या.